# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3242/शि.वि.
दि.29/09/2014

**प्रति,**

मुख्याध्यापक / मुख्याध्यपिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य.शाळा
म.न.पा. नागपूर.

**विषय :– मा.जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर यांच्या तर्फे नागरीकांना करण्यात आलेल्या जाहीर आवाहनास प्रसिध्दी देण्याबाबत.**

**संदर्भ** :– स्वीप – 2 / मतदार जनजागृती कार्यक्रम 2014.

उपरोक्त संदर्भांकित विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, निवडणूक आयोग भारत सरकारतर्फे महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2014 ची घोषणा झालेली आहे. मतदान दि. 15.10.2014 रोजी होणार आहे. नागपूर शहरातील नागरीकांनी निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावण्याबाबत मा.जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आवाहन केले असून याबाबत आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक व शाळा सुधार समितीच्या पदाधिकाऱ्यांना सूचित करावे. सोबत संलग्न मा.जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर यांच्या आवाहनाच्या प्रती काढून अथवा माहिती विद्यार्थ्यांना लिहून देवून ते आपल्या आई वडीलांना दाखविण्याबाबत सूचित करावे. तसेच शाळेत दर्शनी भागात सूचना फलकांवर लावावे. याबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शाळा सुधार समितीच्या सहाकार्याने प्रभातफेरीचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या हाती निर्भयपणे मतदान करण्याबाबतचे फलक दयावे. या विषयावर रांगोळी स्पर्धेचे व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करावे.

विद्यार्थ्यांच्या पालकांकडून संकल्पपत्र भरून घ्यावयाचे आहे त्याचा नमूना सोबत संलग्न असून विद्यार्थीनिहाय त्याच्या प्रती काढून पूर्ण माहिती भरलेले संकल्पपत्र शिक्षण विभाग कार्यालयात श्री. प्रशांत टेंभूर्णे यांच्याकडे जमा करावे. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल कार्यालयात सादर करावा.

**सहपत्र** :– संकल्पपत्र, आवाहन पत्र.

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

# संकल्प पत्र

मी ................................................... शपथ घेतो की, मी भारतीय घटनेने मला मतदान करण्याचा जो अमुल्य अधिकार दिला आहे त्या अधिकाराचा कोणत्याही परीस्थितीत वापर करीन.

मतदान करून आपला उमेदवार निवडण्याचा माझा फक्त अधिकार नसून ती माझी राष्ट्रीय जबाबदारी आहे. मी अशीही शपथ घेतो की, देशहिताकरीता जनतेच्या इच्छाआकांक्षा पूर्ण करू शकणाऱ्या सर्वोत्तम उमेदवाराची निवड करण्यासाठी मी माझ्या कुटूंबातील सदस्यांना तसेच माझ्या परीचीत व्यक्तींना मतदान करण्यासाठी प्रेरीत व प्रोत्साहीत करीन.

मी अशीही शपथ घेतो की, मी कोणत्याही भितीपोटी, लालसेपोटी मतदान करणार नाही तसेच धर्मनिरक्षेप भावनेने मतदान करण्याची जबाबदारी मी पार पाडीन.

दिनांक :–

सही

मतदाराचे नाव ....................................

पत्ता :– ............................................................

............................................................

............................................................

मतदान केंद्र क्रमांक व नाव – ............................................................

विधानसभा क्रमांक व नाव – ............................................................

## जिल्हा निवडणूक कार्यालय, नागपूर
## तर्फे नागरिकांना जाहीर आवाहन

निवडणूक कालावधीत एखाद्या व्यक्तिस त्याच्या मतदानाचा हक्क बजावितांना त्याचे मत वळविण्यास प्रवृत्त करण्यासाठी देणगी रुपाने प्रलोभन देणे किंवा घेणे हा भारतीय दंड संहितेचे कलम १७१ (ब) नुसार गुन्हा असून त्यासाठी एक वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होवू शकते.

कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही उमेदवारास किंवा मतदारास किंवा कोणत्याही व्यक्तिस कोणत्याही प्रकारची इजा करण्याची धमकी देणे हा भारतीय दंड संहितेचे कलम १७१ (क) नुसार गुन्हा असून त्यासाठी एक वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होवू शकते.

करीता सर्व नागरीकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की त्यांनी कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये तसेच कोणत्याही प्रकारची लाच देणे किंवा घेणे बाबत माहीती प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथील तक्रार निवारण केंद्रतील २४ तास सुरु असणा-या **टोल फ्री क्रमांक १८००२३३९०००** वर संपर्क साधावा.

सर्व मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार निर्भिडपणे पार पाडून लोकशाही प्रणाली बळकट करण्यासाठी हातभार लावावा.

जिल्हा निवडणूक अधिकारी
नागपूर